
Good luck
with your Exams



माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!

**'आशेचे किरण'** या खास मालिकेतील हे शेवटचं पत्र! मला खात्री आहे की या पत्रांमधून केलेल्या मार्गदर्शनामुळे तुम्हाला परीक्षेचा अभ्यास करणं सोपं होईल व तुम्ही अजून जास्त जोमाने आणि आनंदाने अभ्यास कराल! आणि त्याहूनही महत्वाचं म्हणजे येणाऱ्या परीक्षांमध्ये दणदणीत मार्कांनी पास व्हाल!

मित्रांनो!

या पत्रातून काही वेगळ्या गोष्टींकडे तुमचं लक्ष वेधणार आहे. यामध्ये सर्वात पहिला मुद्दा आहे-नापास आणि सप्टें.-ऑक्टो. परीक्षांचा निकाल. तुम्हालाच काय कोणालाही वाचून धक्का बसेल की गेल्या वर्षीचा सप्टें.-ऑक्टो. परीक्षांचा १०वीचा निकाल अवघा २०टक्के तर १२वीचा निकाल पण जेमतेम १७ टक्केच होता. गेल्या वर्षी १०वी-१२वी मिळून मार्चच्या परीक्षेत एकुण ९लाखांच्यावर विद्यार्थी नापास झाले होते आणि त्यापैकी फक्त ४लाख १० हजार विद्यार्थी सप्टें.-ऑक्टो. च्या परीक्षेला बसले होते. या परीक्षांत त्यापैकी अवघे ७८ हजार विद्यार्थीच पास होऊ शकले. थोडक्यात काय तर **'पुढच्यास ठेच लागल्यावर मागच्यांनी शहाणं होण्याची'** गरज आहे. कारण सप्टें.-ऑक्टो. परीक्षांचा निकाल आजपर्यंत २५टक्क्यांच्या पुढे गेलेला नाही. यामुळे वेळीच सावध होऊन आपण पास कसे होऊ हे बघणे आवश्यक आहे.

आपण प्रत्येक ठिकाणी स्पर्धा बघतोच आहे. स्पर्धेच्या या काळात जिथे अव्वल दर्जाचे करिअर घडवण्यासाठी ६० टक्के मिळवणाऱ्याला ७० टक्के मिळवण्याची ओढ असते तर ७० टक्के मिळवणाऱ्याला ८० टक्क्यांची! एकेका टक्क्याने मेडिकल, इंजिनियरींग किंवा मॅनेजमेंटची ॲडमिशन हुकते तेव्हा एकेका गुणाचे महत्वही अधोरेखित होते. असे असताना नापासांची अवस्था बिकट झाल्यास आश्चर्य वाटू नये. असे असले तरी १०वी-१२वी नापास विद्यार्थ्यांसाठीसुद्धा करिअरच्या संधी व बरेच पर्याय उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठी गरज आहे सर्व शक्ती पणाला लावून अभ्यास करण्याची व राहिलेले विषय येणाऱ्या परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवून पास होण्याची.

मित्रांनो, आपण अक्षरश: माहिती-तंत्रज्ञानाच्या सुवर्णयुगात आहोत. आज जगभरातील माहिती आपण घरबसल्या मिळवू शकतो. रोज नवनविन करिअर्स्‌ची दारे आपल्यासाठी उघडताहेत. त्यामुळे प्रचलित शिक्षण पद्धतीनेच आपण पुढे जाऊ शकतो अशी आज परिस्थिती नाहीए. एकदा आपण १०वी-१२वीचा टप्पा ओलांडला की आपण बऱ्याच क्षेत्रांच्या माध्यमातून आपलं करिअर घडवू शकतो. परंतु त्यासाठी किमान भाषेचा-इंग्रजीचा तरी पाया पक्का असावा. ॲनिमेशन असेल, वेब डिझाईन असेल किंवा अगदीच कला क्षेत्रातील इव्हेंट मॅनेजमेंट असेल इत्यादी कितीतरी क्षेत्र आहेत. याशिवाय मुक्त शिक्षणाचा पर्यायसुद्धा आहेच.

खरं म्हणजे **'ज्ञान गंगा घरोघरी'** हे ध्येय वाक्य असलेलं **'यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ'** हे प्रकारचं वरदानच आहे. या विद्यापीठात शिक्षणाच्या असंख्य संधी आहेत त्याही आपल्या सोयीनुसार! इंजिनिअरींग पासून तर मॅनेजमेंट पर्यंत प्रत्येक प्रकारचं शिक्षण या विद्यापीठात उपलब्ध आहे. आज या विद्यापीठातून बाहेर पडणारे विद्यार्थी यु.पी.एस्.सी./एम्.पी.एस्.सी. सारख्या अत्यंत कठिण पण तेवढयाच मानाच्या परीक्षांमध्ये यश मिळवून या विद्यापीठाचा नाव लौकिक वाढवित आहेत. तुम्ही सुद्धा या मार्गाने जाऊन तुमच्या करिअरलाच नव्हे तर संपूर्ण आयुष्यालाच नवी कलाटणी देऊ शकता.

अपयश कधी कधी माणसाला लाख मोलाचा धडा शिकवून जातं. अपयशाने खचून न जाता त्यातून बाहेर पडून पुढील आयुष्यात असामान्य कामगिरी केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात बघायला मिळतात. महात्मा गांधी, कुसुमाग्रज, अल्बर्ट आईन्स्टाईन, रामानुजन, आर.के.नारायणन आणि अशी कितीतरी दिग्गज मंडळी आपल्या शैक्षणिक जीवनात कधी ना कधी नापास झाली होती. परंतु त्यांनी अपयशावर मात करून आपापल्या जीवनात भरीव कामगिरी केली. फार कशाला आजच्या फेसबुकच्या जमान्यात सुद्धा अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. खुद्द फेसबुकचा जनक मार्क झुकरबर्ग, बिल गेटस्, ॲपलचा जनक स्टिव जॉब्ज् हि मंडळीसुद्धा चक्क शाळा-कॉलेजेस् मधून ड्रॉपाऊटस् झालेली होती. परंतु त्यांनी कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात स्वत:ला वाहून घेतलं. म्हणूनच मार्क झुकरबर्ग हा सर्वात तरूण अब्जाधिश झाला, बिल गेटस् जगातील श्रीमंतांच्या यादीत नेहमी पहिल्या तीन मध्ये असतो. स्टिव जॉब्ज्‌ने ॲपल आयपॉड सारखी अफलातून उपकरणं तयार केलीत. एखादं अपयश किंवा नापास होणं ही आपल्या जीवनातील असंख्य घटनांपैकी एक असते. तीचा आपल्या भावी जीवनावर प्रभाव पडू द्यायचा किंवा नाही हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असतं. तुमच्याही आयुष्यात अजून करण्यासारखं भरपूर आहे, तेव्हा लवकरात लवकर चांगल्या मार्कांनी पास व्हा आणि पुढील मार्गाला लागा!

"तुम्हाला मन:पूर्वक शुभेच्छा! बेस्ट ऑफ लक! हॅव अ ग्रेट लाईफ अहेड"

तुमचा लाडका,

भारूकाका

Help Line No. 086523 40256